४९०/पु ५१

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक [illegible] पु० ५६(५६२)

ग्रंथ नाम [illegible]गवत

विषय कथा पुराणें

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगणेशायनमः श्रीसच्चिदानंदायनमः श्रीसरस्वत्यैनमः श्रीगुरुभ्योनमः ॐनमोश्रीजनार्दना नाहींभवअभवभावना
नदेखोनिमीतूंपणा नमनश्रीचरणासद्गुरूराया १ श्लोक भक्त्याभागवतंभावंअभावंकाव्यपाठतः पठनात्पदव्यु-
त्पत्तिर्ज्ञानप्राप्तिरस्तुभक्तितः १ टीका नमूंश्रीएकदंता एकपणेंतूंनिआतां एकीविंदाविसीअनेकता परीएकात्मता
नमोडे २ तुजमाजीवासचराचरा ह्मणोनिह्मणिजेलंबोदरा यालागींसकळाचासोइरा सात्यकारातूंहोसी ३ तुजदे-
खेजोनरु त्यासिसखदुःखाचासंसारु यालागींविघ्नहरु नामादरुतुजसाजे ४ हर्षतेवदनगणराजा च्यारीपुरुषार्थ
च्यारीभुजा प्रकाशियाप्रकाशिवोजा तोझळकततुझानिजदंतु ५ पूर्वउत्तरमीमांसादोन्ही लागलियाश्रवणस्थानीं
निःशब्दादिबाचावदनीं करजोडूनिउभिया ६ एकेविकाळेंसकळसृष्टी आपुलेपणेदेखतउठी नेतुझीदेखणीदृष्टी
सुखसंतुष्टीविनायका ७ सुखानेंपेललेंदोंद नामीआवर्तआनंद बोधाचामिरवेनागबंध दिसेसन्नद्धसाजिरा
८ प्रकृतिपुरुषचरणदोन्हीं तळींघालसीएकपणीं तयाचेसहजासनीं पूर्णमणीमिरविसी ९ तुझीअणुमात्रझालि
याभेटी शोधितांविघ्नपडेदृष्टी तोंडिसीसंसारफासाची तोतुझेमुष्टीनिजपरशु १० भावेंभक्तुजोआवडे त्यांचेंउगवि-
सीभवसांकडें वोढूनिकाढिसीआपणाकडे निजनिवाडेंअंकुशें ११ साचेनिरपेक्षजोनिःशेष त्याचेंतूंनिवाडविसीसु
ख देवुनीहर्षाचेमोदक मिरविसीदेखनिजहस्तें १२ सूक्ष्माहूनीसूक्ष्मसान त्यामाजीतुझेंअधिष्ठान यालागींमूषक
वाहन नामाभिधानतुजसाजे १३ पाहतांनरुनाकुंजरु अव्यक्तव्यक्तीपरु ऐसाजोनिर्विकारु नमनादरुग्रंथार्थीं १४
ऐसीयाजीगणनाथा मीपणेंकैंचानमिता अकर्तानिजालाकर्ता ग्रंथकथाविस्तारा १५ आतांनमूंसरस्वती जेसारासार
विवेककर्ती चेतनारूपेंइंद्रियवृत्ती जेजाळितीसर्वदां १६ जेवाचेचीवाचक जेबुद्धीचीद्योतक जेस्फूर्तीचीदायक स्वयेंदेख

स्वप्रभ १७ तेशिवाअंगीशक्तीउठी जैसीडोळयामाजीदृष्टी कींसंकरसखेंदावीपुष्टी फळपणें पोटीफळाचा १८ साखरेअं
गीस्वादु कींसुमनामाजीमकरंदु तैसाशिवशक्तिसंबंधु अनादिसिद्धुअतर्क्य १९ तेअनिर्वाच्यनिजगोडी चहूवाचामाजी
वाडी ह्मणोनिवागेश्वरीरोकडी ग्रंथार्थीचोखडीनविदावी २० सारासारनिवडितीजनीं त्याहंसावरीहंसवाहिनी बैससी
सहजासनीं अगम्यपणी अगोचर २१ तेपरमहंसीआरूढ तिसीविवेकहंसजाणतीदृढ जवळीअसतांनेणतीमूढ अ
भाग्यदृढमनिमंद २२ तिचेंनिर्धारितांरूप अरूपाचेंचिस्वरूप तैंआपुलेपणेंअमुप यथानुरूपबोलवी २३ हाबों-
लूभलाजाला ह्मणोनिबोलिलेचित्तविला तैसास्फूर्तीभावरूपजला बोलीबोलिलागौरवी २४ तोवाग्विलासपरमेश्व
री सर्वांगदेखणीसुंदरी राहोनीसबाह्य अभ्यंतरीं ग्रंथार्थकुसरीवदसीस्वयें २५ तेसदांसंतुष्टसहज ह्मणोनिनिरूप-
णाचेचदलेभोज परीवक्तेपणाचाफुंज मीपणेंसजयेउनदी २६ वाग्देवतेचीस्फूर्ती वाचाचीजालीवदती तेथेंद्वैताचिये
संपत्ती उपजनिश्चितीउपजेना २७ तिणेंबोलणेंमोडलें समूळमीपणतेंतोडिलें त्यावरीनिरूपणघडलें नबोलणेंबो
लेबोलवी २८ तिसीसेवकपणेंदुसरा राहोनिरिघेनमस्कारा तेंवमीपणेंसीपरा निजनिर्धारापारुषे २९ जेथेंमीपणा
चा आभावो तेथेंतूंपणाकैंचाठावो यावरीकरीनिर्वाहो अगम्यभावोनिरूपणी ३० जैशासागरावरीसागरीं चालती
लहरीयाच्याहारी तैसेंशब्दस्वरूपाकारी स्वस्वरूपावरीशोभती ३१ जैशासाखरेच्याकणिका गोडियेभिन्ननहोती-
देखा तैसेंनिरूपणयेरसाळसुखा तेविदेखारसवृत्ती ३२ तेथेंमीपणेंसीसरस्वती बैसविलेएकलाटींरसवृत्ती तेणें
अभिन्नशोषदेउनीतृप्ती तेउद्गारयेतीकथेचे ३३ आतांवंदूंतेसज्जन जेकांआनंदचिद्घन वर्षतातीस्वानंदजीवन सं- १
तसजननिववावया ३४ तेचैतन्याचेअलंकार कींब्रह्मविद्येचेश्रृंगार कींईश्वराचेमनोहर निजमंदिरनिवास ३५ तेअ

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

धिष्ठा अधिवास कीं स्करवासी स्करवोल्हास विश्रांतीसि विश्वास निजरहिवास करावया ३६ कीं ते भूतदयार्णव कीं-
माहेरा आलीकणव नातें निर्गुणाचें अवयव निजगौरवस्वानंदा ३७ नातेडोल्ह्यातील दृष्टी किंतिचीहो देखणीपुष्टी-
कीं संतुष्टीसी तुष्टी चरणांगुष्ठीं जयाचें ३८ ते पाहती जयाकडे त्याचेंउगवे भवसांकडें परब्रह्म डोळयापुढें निज निगाडेउ
ल्हासें ३९ तें साधनचतुष्टयसायास न पाहती शास्त्रचातुर्यविलास एक धरिला पुरेविश्वास स्वयंप्रकाशनें करिती ४०
जे जगामाजी सदां असती जीवमात्रातें दिसती परि विकल्पें निठकिजती नाहीं ह्मणती नास्तिक्यें ४१ मातियेचा द्रोण केला
तो कौळिकाभावो फळला ह्मणोनि विश्वासा विण नाडला जगु [illegible] कविला विकल्पें ४२ एका एकीं विश्वास ना तरी वाणी नाहीं
निजसंता त्याचे चरणीं भावार्थ ना देवितां माथा विश्वासें ४३ तें नमस्कारितां अवश्यक करूनि ठाकती एक परी एकप-
णें सेवक त्याचा निदेखस्वयेंव्हावा ४४ त्यांचि येसे [illegible] ब्रह्मस्वरूपाची उपमा थोडी जे भजती अनन्य आवडी ते जा
णती गाटी निजचवी ४५ ते प्रकृतीसी पर प्रकृतिरूपें [illegible] आकारविकारव्यवहार त्याचे निसाचारबाधि ४६ ते
भोगावरी न ठेवती त्यागावरी न उठती आपलीये स[illegible]स्थिती स्वरें वर्तती सर्वदां ४७ ते ज्ञानेपण न मिरविती पिसेप
णन दाखविती स्वरूपफुंजवी स्मृती गिळोनि वर्तती निजांगें ४८ प्रेमा आंगींचा जिरला विस्मयो येवोचि विसरला प्र-
पंच परमार्थ एक जाला हा ठेला विभागु ४९ स्मरण विस्मरणेंसि गेलें देहदेहींचह्मारपलें आंतु बाहेरपण गेलें गेलें ठेलें
स्मरेना ५० स्वप्न जागृती जागतां गेली सुषुप्ती साक्षित्वें बुडाली उन्मनीही वेडावली तुर्या ठेली तटस्थ ५१ ज्ञान अज्ञाना
तें घेऊनि गेलें तंव ज्ञातेपणही बुडालें विज्ञानही आंगीं घडलें परी न वेंजन्मलें हे न मनीं ५२ या परी जे निजसज्जन नि
हीं व्हावें सावधान द्यावें मज अवधान हें विज्ञानपण बाळकलें ५३ दृश्य द्रष्टेनसीं गेलें दर्शन एकलेपणें निमालें तें नि

मणंहिविरालें विरविनेनेलेंविरवितेनि ५४ तंवसंतसज्जनएकवेळा थोरकरूनियांसोहळा आज्ञापिलोंवेळोंवेळां ग्रंथकरवि
लाभाकून ५५एकांतीआलीलोकांतीं थोरसाक्षेपुकेलासंतीं तरीसांगाजीमजमती कोणेंग्रंथींप्रवर्तूं ५६पुराणींश्रेष्ठभा
गवन त्याहीमाजीउद्धवगीत तुवांप्रवर्तावेंतेथ वक्ताभगवंततुजसाद्य ५७ आह्मांसिपाहिजेज्ञानकथा वरीतुजसारिखा
रसाळवक्ता तरीस्तुतीसांडुनी आतां निरोपणतत्वताचालवी ५८ तुजसंतस्तवनींउत्सावो हातवकळलाभावो तरीकथे
चालवलाहो निजनिर्वाहोउपपादी ५९ यासंतांचेनिरूपणवचनें एकाआनंदलामनें तेणेंवाक्प्रसायदानें स्वानंदघनेंउ
ल्हासे ६०जैसामेघाचेनिगर्जनें मयूरउपरमोनिपाहेगगनें नानानवेनिजीवनें चातकुमनेंउल्हासे ६१ कांदेखोनिनि-
शाकर डोलोंलागलेचकोर तैसेंसंतवदनींचेंउत्तर आलेंथोरसुखावलि ६२ थोरसुखावाकेलास्वामी तुमचेपुरनेक
रालतुह्मीं तरीवायांचिमीपणेंमी मनोधर्मीवकघलों ६३ परीसमर्थाचीआज्ञा दासांनकरवेअवज्ञा तरीसांगीतलीसं-
ज्ञा तेंकरीनआज्ञासंतांची ६४ परीतुह्मींएककरावें अखंडअवधानमजद्यावें तेणेंदिठिव्याचेनिअघवें पावेस्वभावेंनिज
सिद्धि ६५ आतांतुझियामनामाजीमन शब्दींठेविलें असेअनुसंधान यालागींनिजनिरूपण चालवींजाणसवेगें ६६
आतांवंदूंकुलदेवता जेएकविराएकनाथा तेएकावांचूनिसर्वथा द्वैताचिकथाकरूंनेदी ६७ एकरूपदाविलेंमनीं तंवए
कचिदिसेजनीवनीं एकचिकानींवदनीं एकपणीएकविरा ६८ तेशिवशक्तिरूपेंदोन्हीं लेउनीमिरवेएकपणीं एकपणेंजा
लीगुर्विणी प्रसवेएकपणेंएकांगविरु ६९ तेएकरूपेंएकविरा प्रसवलिबोधपरशधरा जयाचाकांदरारा महाविराअ
भिमानियां ७० तेणेंउमजोनिनिवटिलीमाया आज्ञापाळूनिस्फुरवदेपितया ह्मणोनितोजालाविजया लवलाह्यादिग्मं २
डळीं ७१ जोवासनासहस्त्रबाहो छेदिलासहस्त्रार्जुनअहंभावो स्वराज्यकरूनियांपाहो अर्पीस्वयमेवोस्वजातीसी ७२

तेणेंमारूंनियांमाताजीवविली तेंचिकुलदेवतास्वयेंजाली परीस्वनामेंरव्यातीकेली एकात्मबोळीएकनाथा ७३ तेजैंप
रूनीनिवटिली तेंपारूनीभक्तीपाळटली रागत्यागेंशांतिझाली निजमाउलीजगदंबा ७४ तयावोसंगाघेउन थोरदिध-
लेंअश्वासन विषमसंकटींसमाधान स्वनामस्मरणकेलिया ७५ तेजयजयजगदंबा उदोह्मणोनिग्रंथारंभा मतिमाजी
स्वयंभा योगगर्भामगटली ७६ आतांवंदूंजनार्दन जेभवगजपंचानन जनींविजनींसमाधान सदांसंपूर्णसर्वत्र ७७ ज्या
चेनिरूपा अपांगें देहींनदेखतीदेहांगें संसारटवाळतेणें केलेंवाओंभवस्वप्न ७८ जयाचेनिरूपाकटाक्षें अलक्षलक्षेंविण
लक्षें साक्षविसरलीसाक्षें निजपक्षेंगुरुत्वें ७९ नेणेंजिवेंविणाजिवविलें मृत्यनेंमरणचिमारिलें दृष्टिघेउनीदाखविलें -
देखणेंकेलेंसर्वांग ८० देहदेहींविदेहकेले सेरवींविदेहपणाहीनेलें नेलेपणहीहारपलें परिउरलेंउर्वरित ८१ अभावभावेंसि
गेला संदेहनिःसंदेहेसिंनिमाला विस्मयोविस्मईंबु[illegible]लास्वानंदु ८२ तेथेंआवडीहोयभक्त तंवदेवोचिपणा-
आंत मगभज्यभजनाचाअंत दावीअमांतस्वलीळा ८३ नमननमनपणेंसींगेलें नमितेंनेणोंकायजालें नम्यचिआंगीं
घडलें घडलेंमोडलेंमोडुनी ८४ दृश्यद्रष्टाजाण दोहीं[illegible]ण दर्शनहीजालेंक्षीण देखतेपणगिळूनि ८५ आतांदे-
वोचि अघवा तेथेंभक्तनयेभक्तभावा तंवदेवोहीमुकलादेवा देवस्वभावाविसरोनी ८६ देवदेवपणेंदाटला भक्तभक्तप
णेंआटला दोहींचाही अंतजाला अभेदाआलाअनंत ८७ अत्यागत्यागेंसींविसरला अभोगभोगेंसींउडाला अयोग-
योगेंसीबुडाला योग्यतेचागेलाअहंभावो ८८ ऐसीयावरी अधीकसोस सायोज्यामाजीहोतसेदास तेथेंसुरवाचासो-
रस अतीविश्वास अगोचरू ८९ शिवेंशिवचियजिजे हेंऐसेंअवस्थेसींसाजे येन्हवींबोलुचिबोलिजे परीनपविजेनि-
जभजन ९० येअभिन्नसुखसेवेआंत नारदआनंदेंगातनाचत शुकसनकादिकसमस्त जालेनिजभक्तयेणेंसुखें ९१

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

सागरींभरेभरिनें तेंभरितेंभरितेरीयातें तैसेंदेवेंचिदेवपणयेथें केलेंमातेंनिजभक्त ९२ सागरसरितांजीवनएक परिमि
ळणीभजनदिसेअधिक तैसेंएकपणेंदेख भजनसुखउल्हासे ९३ वामसव्यदोन्हीभाग परीदोनावींएकआंग तैसादेव-
भक्तविभाग देवपणींसांग अभासे ९४ तेवींआपुलेपणाचेंनिमाणें भक्तकेलाजनार्दनें परीकायावाचामनें वर्तविजेते
णेंसर्वार्थीं ९५ तोमुखाचेंनिजमुख दृष्टांतेंप्रगटेसन्मुख तोचिविवेककरूनिदेख करविलेलेखग्रंथार्थें ९६ परीनव
लत्याचेंलाघव अभंगींघातलेंमाझेंनांव सेखींनिवाचानिजभाव उरावयाठावनुरेची ९७ यावचनार्थीसंतोषला
ह्मणेभलारेभला निजभाविकातूंसंचला प्रकटकेलागुह्यार्थु ९८ हेस्तुतीकींनिरोपण ग्रंथपिठकींब्रह्मज्ञान सा
हित्यकींसमाधान सज्ञानहीजाणकळेना ९९ तुझाबोलचिएकएक सोलिवविवेकाचाविवेक तोसंतोषासिसंतोष
क अत्यंतिकउपजवी १०० तुझेनिमुखेंजेंजेंनिघे तेंतेंनिरंतरसाचचिलागे मुमुक्षुसारंगाचीपाळिगे रुंजीनिजांगें
करतील १०१ ग्रंथारंभूपडिलाचोख मुक्तमुमुक्षुइतरलोक श्रवणमात्रेंचिदेख निजात्मसुखपावती २ येणेंवच
नामृतेंतुषारे ग्रंथविभूमिकाविवेकांकुरे अंकुरलीपैंपसरें फळसंभारसफळित ३ किंनिर्जिवाजीवआला नातरी-
सिद्धासिसिद्धिलाभूजाला कींनिजवैभवेंआपुला प्रियोमिनलापतिव्रते ४ तैसेंनिहर्षानंदें जीजीह्मणितलेंस्वा
नंदें तुमच्यानिपादप्रसादें करीनविनोदेंग्रंथार्थु १०५ श्रीरामप्रतापदृष्टी शीळातरतीसागरापोटीं कींवसिष्ठवच-
नासाठीं तपेंकांठीरवीमंडळीं ६ कींयाज्ञवल्कीच्यामंत्राक्षता शुष्ककाष्ठींपल्लुवता कींधर्मेश्वानुसरता केलासर्वथा
स्वर्गलोकीं ७ तैसामाझेनिनावें ग्रंथहोतीसुहावें आज्ञाप्रतापगौरवें गुरुवैभवेंसार्थक ८ घटिनएकाएकादशें श २
शिनक्षत्रएकचिअसे त्याएकामाजीजैंपूर्णदिसे तैंदशादशांशोचढेअधिक १०९ तेथेंदेखणेंचिकरूनिदेखणें अ

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai joint project

वर्षेंचि निर्धारूनि मनें त्यावरी एकाजनार्दनें टिकाकरणें सार्थक ११० पाहोनि दशमीचा प्रांत एकादशीच्या उदया आंत ए
कादशावरी जगन्नाथ ग्रंथार्थ आरंभीं ११ ह्मणोनि एकादशाची टीका एकादशीस करी एका एकपणाचिया सरवा फळे
लदेखा एकलें १२ आतां वंदूं महाकवी व्यास वाल्मिक भार्गवी जयाते उशना कवी पुराण गौरवीं बोलिजे १३ तेही आपु
लिये व्युत्पत्ती वादवावी माझी मती हें निकरीं नसे विनंती ग्रंथ समाप्ती न्यावया १४ वंदूं आचार्य शंकर जो ग्रंथार्थीं वि
वेकचतुर सारूनि कर्मठ तेचा विचार प्रबोधदिनकर प्रकाशिला ११५ इतरही टीकाकार काव्यकर्ते विवेकचतुर त्यां
त्याचरणीं नमस्कार ग्रंथीं सादर तिहीं व्हावें १६ वंदूं प्राकृत कवीश्वर निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर नामदेव चांगदेव वटेश्व
र ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा १७ जयाचे ग्रंथ पाहतां ज्ञानज्ञेय प्राकृतां तयांच्या चरणीं माथा निजात्मता निजभावें
१८ संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी भाषा रूतिकाय उणिवी नरी जुनी ह्मणावीं रूमनें केवीं रूवर्णाचीं १९ कपिलेचें ह्म
णावें क्षीर माइतरांचें काय नीर वर्णस्वादें मधुर दिसे साचार सारिखें १२० जे पाविजे संस्कृत अर्थें ते न लाभे प्राकृतें
तरी न मनाव्या येथें विषम चित्तें ते काय २१ निरंजनीं सखा रावो तो चि सेवका पावन ठावो ते थेंसे वेसीन वचता पाहो
दंडी रावो निजभृत्या २२ देशभाषा वैभवें प्रपंच परमार्थ पावले दोन्ही नावें परी रामकृष्णादि नामा न न्हे भाषा वैभवें पालटु
२३ संस्कृत वाणी देवें केली तरी प्राकृत काय चोरापासूनी जाली आस तु या अभिमान भुली वृथा बोली काय काज २४
आतां संस्कृत अथवा प्राकृता भाषा जाली हे हरिकथा ते पावन चीन लता सत्य सर्वथा मानली १२५ वंदुं भानुदास आतां
जो कां पितामहाचा पिता ज्याचे निवंश भगवंता जाला सर्वथा प्रियकरु २६ जेणें बाळपणीं आकळिला भानु स्वयें जाला
निद्भानु जिंतोनि मानाभिमानु भगवन्पावनु स्वयें जाला २७ जयाचिया पदबंधा प्रति पाहों आली विठ्ठलमूर्ती का

(8)



नींचींकुंडलेंजगजोनी करितांरात्रीदेखिला २८ तयाभानुदासाचाचक्रपाणी तयाचासूनसलक्षणी तयासूर्यनामठे
ऊनी निजींनिजहोऊनिभानुदासठेला २९ तयासूर्यप्रभाप्रतापकिरणी मातामसवलीरुक्मिणी ह्मणोनिरुक्माईजननी
आह्मालागुनीसाचची १३० हेग्रंथारंभकळा वंदिलीपूर्वजमाळा धन्यनिजभाग्याचीलीळा आलोंवैष्णवकुळाजन्मोनीं-
३१ तेवैष्णवकुळींकुळनायक नारदप्रल्हादसनकादिक उद्धवअक्रूरश्रीशुक वसिष्ठादिकनिजभक्त ३२ तेवैष्णवसक
ळ ग्रंथार्थीअवधानशिळ ह्मणोनिवैष्णवकुळमाळ वंदिलीसकळग्रंथार्थी ३३ उपजलोंज्याचियागोत्रा नमनतया-
विश्वामित्रा जोकांप्रतिसृष्टीचाधाता गायत्रीमंत्रामहत्व ३४ जेउपनिषदविवेकी तोवंदिलायाज्ञवल्की जोकर्तयाते
पोषी कृपापीयूषवर्षोनी ३५ नमनभूतमात्राआसे त्या नर्णेविश्वंभरूजालासरवा ह्मणोनिग्रंथारंभूदेखा आलानेद-
कासमतासी १३६ आतांनमूंदत्तात्रया जोकांआचार्या आचार्या तेणेंप्रवर्तविलेंग्रंथकार्या अर्थव्हावयानिजबोधु-
३७ तोशब्दानेंदावितु अर्थअर्थीप्रकाशितु भगवत्कृपणाचीमातु स्वयेंवदवितुंयथार्थें ३८ तोह्मणेश्रीभागवततें
भगवंतानेंतद्दत्त त्यासीचहोयप्राप्त ज्याचेंचित्तलागलेंती ३९ तेंहेंज्ञानकल्यादि श्लोकपदबंधी उपदेशिलासद्बुद्धी-
निजात्मबोधींविधाता १४० नवलतयाचासद्भावो शब्दमात्रेंजालाअनुभवो बापसद्गुरुकृपापाहो केलानिःसंदेहो
परमेष्ठी ४१ तोचतुःश्लोकींचाबोधु गुरुमार्गीआलाशुद्धु तेणेंउपदेशिलानारदु प्रतिप्रबुद्धुभावार्थी ४२ तेणेंनार
दनिवाला अवघाअर्थमयजाला पूर्णपरमानंदेंधाला नाचोंलागलानिजबोधें ४३ तोब्रह्मविणावाहतु ब्रह्मप
देंगीतगातु तेणेंब्रह्मानंदेंनाचतु विचरेइत्सतुभूमंडळीं ४४ तोआलासरस्वतीतीरा तेथेंदेखिलेंव्यासऋषेश्वरा
जोसंशयाचापुरा अतिदुर्धरामाजींपडला १४५ वेदार्थसकळपुराण व्यासेंकेलेंनिर्माण परीतोनपवेचिआपण नि



Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

ज्ञसमाधानस्वहिताचें ४६ तोसंशयसमुद्रा आंतु पडोनिहोनाबुडतु तेथेंपावलाब्रह्मसुतु नाभीह्मणतुकृपाळु ४७
तेणेंएकांतींनेउनीदेख व्यासासिकेलेंएकमुख मगदाविलेचारीश्लोक भवमोचकनिर्दुष्ट ४८ तेंसूर्यातेंनदाखउनी गग
नानेंहींचोरुनी कानानेंपरतेंसारुनी देलाउपदेशुनीनिजबोधु ४९ तेंनारदाचेंवचन करितसंशयाचेंदहन तवव्यासा
सिसमाधान स्वसुखेंपूर्णहोसरलें १५० मगश्रीव्यासें आपण भागवतदशलक्षण शुकासिउपदेशिलेंजाण निजबो
धेंपूर्णसार्थक ५१ तेणेंशुकहीसुखावला परमानंदेंनिवाला मगसमाधिस्थराहिला निश्चलदेलानिजशांति ५२ ते
थेंस्वभावेंनिजाणा समाधीआलीसमाधाना मगपरिक्षितीचियाब्रह्मज्ञाना अवचटेंजाणातोआला ५३ पहावया
परिक्षितीचा अधिकारु तवकळीसी केलातेणेंमारु नरीधर्माहूनिकाय थोरु असेअधिकारुपैंयाचा ५४ कृष्णा अ
सतांधर्मजाला पाठीकळी भेणेंतोपळाला परीहावकळीनिग्रहूनिठेला धर्माहूनिभलाधैर्यअधिक ५५ अर्जुनवीर्यपरंपरा
निर्व्यंग सुभद्रामातामहीचेंगर्भलिंग तोअधिकारीरत्नउपलिंग ज्यासीरक्षिताश्रीरंगगर्भीआला ५६ गर्भीअस
तांज्याभेणें स्पर्शोनशकेशस्त्रद्रोण त्याचेअधिकारपण सांगावयाकोणसमर्थ ५७ तोअभिमन्यूचापरिक्षिती
उपजलापावनकरितक्षिती ज्याचेनिभागवताचीख्याती चालिलीत्रिजगती परमार्थपव्हे ५८ आंगींवैराग्यविवेक
ब्रह्मप्राप्तीलागींत्यक्तोदक तयासीदेखोनीशुक अत्यंतिकसुखावला ५९ बापकोपब्राह्मणाचा शापेंअधिकारब्र-
ह्मज्ञानाचा तयाच्याचरणीकायावाचा निजभावाचानमस्कारु १६० ब्रह्माहूनिब्राह्मणथोरु हेमीचिकाय थोर क-
रूं परीअद्यापिह्रदयींश्रीधरु चरणाळंकारमिरवितु ६१ ह्मणूनिब्रह्माचादेवोब्राह्मण हासत्यसत्यमाझापण या
लागींवेदरूपीनारायण उदरायेउनवाढला ६२ ह्मणोनिब्राह्मणभूदेव हेब्रह्मीचिनिजावेव येथेंनभजतीतेमंददेव

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

अतिनिर्दैवअभाग्य ६३ ब्राह्मणप्रतापाचानवलावो तिहीं आज्ञाधारकु केलादेवो प्रतिमेलागीं पाहाहो प्रगटेआयु
र्भावमंत्रमात्रें ६४ तंवसंतह्मणतीकायपाहावें जेंस्तवनींरचसीभावें तेथेंप्रमेयकादिसीनित्यनवें साहित्यघालावें
साचार ६५ गणेशआणिसरस्वती बैसविलीएकपंक्ती तैसीचसंतस्तवनींस्फुती ऐक्यवृत्तीवदलासी ६६ पाठींकुळ
आणि कुळदेवता स्तवनींवदलासीजेकथा तेऐकतांचिचित्तचिंता विसरेसर्वथाश्रवणेची ६७ जोचिभावसंतचरणीं
तोचिभावब्राह्मणीं स्फुरवीकेलेगुरुस्तवनी धन्यवाणीतुझीपैं ६८ तरींतुझेनिमुखेंजनार्दन स्वयेंवदतांहें आपण हें
बोलतांचिखुण कळलीसंपूर्णआह्मासी ६९ वदतेंप्रमयाचेंस्फुरतें तेंभावेंकआवरूनिचित्तें पुढीलकथानिरूपणानें क
रीनिश्चितेंआरोहण १७० विसरलोंहोतोंहाभावो परीभलाविलाआठवो यालागींसद्भावो संतचरणींपाहोठेविला ७१
उणेंदेखालजेथें तेथेंकरालपुरतें सज्जनामाझीसरतें करावेंमातेंग्रंथार्थसिद्धि ७२ तेह्मणतीभलारेभलानेटका बर-
वीआयाआणिलीग्रंथपीठिका आतांसंस्कृतावरीटीका कविपोषकावदेंवहिला ७३ याचिबोलावरीमाझाभावो ठेऊनी-
पावलोंपायाचाठावो तरीआज्ञेसारिखाप्रस्तावो करीनपाहाकथेचा ७४ तरीनैमिषारण्याआंत शौनकादिकांप्रतीमा
त सूतअसेसांगत गतकथाअन्वयें ७५ मागादाहावेस्कंदीजाण कथाजालीनवलक्षण आतांदाहावेंलक्षण सांगे-
श्रीकृष्णएकादशीं ७६ जोनिदाकाशींचापूर्णचंद्र जोयोगज्ञानाचानरेंद्र तोबोलताजालाशुकयोगींद्र परिसतानरेंद्रप
रिक्षिती ७७ तंवपरिक्षितीह्मणेस्वामी याचियालागींत्यक्तोदकमी तेचिकृपाकेलीतुह्मीं तरींधन्यआह्मींनिजभाग्यें ७८
अगाहेसाचारमोक्षकथा ज्यांसीमोक्षाची आस्था तिहींपायदेऊनीमनाचेमाथा रिघावेंसर्वथाश्रवणादरीं ७९ भीत- ५
रीनेऊनीकान कानींरिघावेंनिजमन अवधानकरूनिसावधान कथानुसंधानधरावें १८० बहूअवतारीअवतरलादे

हारपृतनायदुभिर्निरस्यगुप्तैःस्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः मन्येवनेर्नन्नुगतोऽप्यगतंहिभारंयद्यादवंकुलमहोह्यवि
षह्यमास्ते ३ टीका ऐसेपक्षपातीराजेअपार अमितसेनाधराभार मारविलेअधर्मकर मिषांतरकलहाचें १३ पृथ्वी
चेंअधर्मसेनासंभार शोधशोधूंराजेमारिले अपार तरीउतरलाधराभार हेशारंगधरानमानेची १४ यादवकरूनि-
अतुर्बळ नानादुष्टदमिलेसकळ तेणेंयादवजालेप्रबळ हेंनमनेकेवळश्रीकृष्णा १५ नहोतांयादवांचेंनिधन तुतरे
धराभारपूर्ण ऐसेंमानितांजालाश्रीकृष्ण कुळनिर्दळणतोचिंती २१६ अग्निकापुरखाउनीवाढे कापुराअंतींअग्नि-
हीउडे तैसेंयादवांचेअतिगाढे आलेंरोकुडेंमरण १७ केळीफळेंतववाढेवादी फळपाकेमाळीझाडेंतोडी तैसीयाद
वकुळीसीगगाढी वाढलीरोकडीमरणार्थ १८ फळपरिपाकेंपरिमळी तेघेऊनिजायमाळी तैसेंस्वकुळवनमाळी न्या
वयातांकाळीस्वयेंइच्छी १९ अनंतबाहूप्रतापें याद[illegible]श्रीकृष्णाकृपें तोचिनिधनाचेनिसंकल्पें काळरूपेंशो-
भला २२० अतुर्बळेंअतिप्रबळ वाढलेंजेंयादवकुळ तेंचिदेखोनिसकळ असाध्यकेवळश्रीकृष्णासी २२१ श्लो०
नैवान्यतःपरिभवोऽस्यभवेत्कथंचिन्मत्संश्रयस्य[illegible]महनस्यनित्यं अंतःकलिंयदुकुलस्यविधायवेणु-
स्तंबस्यवन्हिमिवशांतिमुपैमिधाम ४ टीका [illegible]निजधामा हेंचिप्रवर्त्ततीअधर्मा श्रीयोन्मत्त अतिगर्व
महिमा मुख्यअकर्मानिजहेतु २२ हेमद्बळेंअतिप्रबळ अतीरथीजालेसकळ यांसीअप्रतिमल्लदिग्मंडळ यांतेंद
मिता केवळमीएक २३ तरींआतांचिआपुलेदृष्टी कुळबांधोकाळगांठी ऐसाविचारजगजेठी निश्चयपोटींदृढकेला
२४ यादववंशजाळीं वाढलींश्रीकृष्णाकृपाजळीं तेथेंअवकृपेचीइंगळी ऋषीशापेंमेळींकपटेपडलीं २२५ तेमुळीपे
टलीकृष्णासंकल्पें धडधडलींब्रह्मशापें तेस्वजनविरोधरूपें काळाग्निकोपेंनाशिली २६ ऐसेंयदुकुळनिर्दळण करूनि

स्वयेंश्रीकृष्ण निस्करनिजधामागमन स्वलीला आपणकरूंइच्छी २७ श्लोक एवंव्यवसितोराजन्सत्यसंकल्पई
श्वरः शापव्याजेनविप्राणांसंजन्हेस्वकुलंविभुः ५ टीका शापहेनाटोपतीइंद्रादिदेवा दैत्यांराक्षसामानवा सेखी
निर्दोलावयायादवा मजतेंह्यांपडेलयेणें २८ यापरी आपुलेंकुळ नासूंआदरिलेंतात्काळ हाचिविचार अदळ केलास
मूळकुळक्षयार्थी २९ हेंचिकार्यहोयकैसें तेंचिविचारिलें अनर्थौशें ब्रह्मशापाचेंनिमिसें कुळअनायासेंनासेल २३० इ
तुकेंकृत्यसिद्धिजाय तैंसंपलें अवतारकार्य स्वधर्मायदुवर्य जावोंपाहेस्वलीला ३१ लीलाविग्रहीस्कंदपण गुणकर्म
क्रियाअतिपावन जगदोद्धारीश्रीकृष्ण ब्रह्मपरिपूर्णपूर्णावतार ३२ श्लोक स्वमूर्त्यालोकलावण्यनिर्मुक्त्या
लोचनंनृणां गीर्भिस्ताःस्मरतांचित्तंपदैस्तानीक्षतां [illegible]ः ६ टीका जोसकळमंगळामंगळपूर्ण जोगोकुळीं-
कामरमण मोक्षाचेंतारूंश्रीकृष्ण त्याचेंबरवेंपण अलौकिक ३३ जोभक्तकामकल्पद्रुम मनोहरवेषमेघःश्याम-
ज्याचेंत्रिलोकींदाटुगेनाम स्वयेंपुरुषोत्तमशोभत ३४ श्रीकृष्णात्यासौंदर्यापुढें लक्ष्मीझलोनिजालीवेडें मदन
पोटा आलेंबापुडें तेथेंकोणीकडेइंद्रचंद्र २३५ त्रैलोक्याचेंबरवेंपण झलोनिकृष्णापासीं आलेंजाण नानारूपालेशें
बरवेंपण शोभेसंपूर्णनिह्नींलोकीं ३६ सकळसौंदर्याचीशोभा कींलावण्याचाअतीवल्लभा ज्याचियाअंगसंगेंप्रभा -
आलीशोभाजगासी ३७ जोहरिखाचासोलिवहरिख कींसुखसुखावतेंपरमसुख ज्याचेनिविश्रांतीसीदेख होयअ
त्यंतिकविसावा ३८ तोअनूर्न वूर्तींधारण कींसकळलोककरितोलालण शोभाशोभवीश्रीकृष्ण सौभाग्यसंपूर्णसा-
जिरा ३९ नयासौंदेखिलेंचिपुरे देखनेसीदेखणेंउरे पाहनेंपाहणेंसीमाघारें लाजोनिवोसरेसलज्ज २४० दृष्टीघा
लीदेदेंकर आपणआपुलेसेजार होऊनियांपरात्पर सुखाचेंसाचारकृष्णरूप ४१ कृष्णाचीचाखिल्यागोडी रस

स्वादु रसनावोसंडी जायचाखिलेपणाचीआवडी चाखितेदवडीचाखोनी २४२ नवलतेंगोडपण अमृतहीफिकेकेलें
जाण यापरीरसनाआपण हरिरसींपूर्णस्रुखावे ४३ लागतांश्रीकृष्णास्रुखावो अवघासंसारुचिहोयवावो सेवि-
तांकृष्णास्रुगंधभावो घ्राणासिपाहोनावडेअन्य ४४ वासस्रुवासस्रुमन घ्रेयघ्राताआणिघ्राण श्रीकृष्णामकरंदें
जाण विश्रांतीसंपूर्णस्वयेंयेत २४५ जयाचेनिअंगस्पर्शें देहींदेहनदिसे आंगचिआंगातेंकैसें विसरे अपैसेंदे-
हबुद्धी ४६ कठिणाकठीणपणगेलें मदानेंमदपणाहीमेलें कृष्णास्पर्शेंऐसेंकेलें स्पर्शाचेठेलेस्पर्शत्वें ४७ नयाचे
निपठणेंवाचा ठावोवाच्यवाचकाचा नेतीशब्देंपुसूनिवाचा करीशब्दाचानिःशब्दु ४८ बोलबोलणेंचिठेलें बोलतें
नेणोकाईजालें कृष्णाशब्देंअसेंकेलें वाचेचेंमेलेंवाचिक ४९ चित्तचिंतितांपाय चित्तपणाविसरोनिजाय मगनि-
श्चिंतपणेंपाहे श्रीकृष्णाचरणीराहेनिवांत २५० चित्तचिंताचिंतन तिहींचिपुरेआठवण चिंतितांश्रीकृष्णाचरण पूर्णे
परिपूर्णनिजचित्ता ५१ नवलतयापराक्रम पाहतांपारुषेंकर्माकर्म मगकर्मकर्ताक्रियाभ्रम करीनिभ्रमपदरजें ५२-
पाहतांपाउलाचेमाग तुटतीकर्माकर्माचेलाग कर्माचीमायासख्यअंग तिचाहीविभागउरोंनेदी ५३ गाईमागिलेंकृ-
ष्णपाउलें पाहतांकर्मकर्तेनसींगेलें अकर्मह्मणतांनाहीं उरलें ऐसेंकर्मकेलेंनिष्काम ५४ जयाचेनिकीर्तिश्रवणें श्रो
तानुरेश्रोतेपणें वक्तापारुषेवक्तेपणें स्वयेंहोणेंपरब्रह्म ५५ श्लोक आच्छिद्यकीर्तिंसुश्लोकांवितत्यह्यंजसानु-
कौ तमोऽनयातरिष्यंतीत्यगात्स्वंपदमीश्वरः ७ टीका यापरीउदारकीर्ती थोरकेलीअवतारख्याती जेणेंजडजीव
उद्धरती श्रवणेंत्रिजगतीपावनहोय ५६ स्वधामागेलियाचक्रधरु मागिलींतरावयासंसारु कृष्णकीर्तीकल्पतरु
ठेउनीश्रीधरुस्वयेंगेला ५७ नवलतारुवाचीस्थिती बुडबूंनेणेंकल्पांतीं श्रवणेंतरलेनेणोकिती पुढेंहितरतीश्रद्धालु ५८

श्रीकृष्णाकीर्तीचिंनारू घालितांआटेभवसागरू तेथेंकोरडापाउलेंउतारू श्रवणार्थेतरूंकेविलाहे ५९ श्रीकृष्णाकीर्तीचिंश्रवण त्याच्यासंसारासीपडेशून्य कीर्तिवंतअतिपावन त्यातेंसुरगणवंदिती २६० आदरेंपडतांश्रीकृष्णाकीर्ती पायालागींच्या रीमुक्ती त्याचेंनिपावनेंत्रिजगती परमनिवृत्तिहरीनामें ६१ कृष्णाकीर्तीनामाक्षरें रिघतांचिश्रवणद्वारें भीतरींलतमए-कसरें रिघेबाहेरागजबजुनी ६२ तंवकृष्णाकीर्तीकथाजगीं नमासिठावोनुरेचिबाहेरी धाकेंनिमेसपरिवारीं कृष्णाकी-र्तीमाझारीपरमानंदू ६३ कृष्णाकीर्तीप्रतापप्रकाशें संसारकृष्णामयचिदिसे कीर्तिकीर्तिमंताऐसें देअनायासेंनिजसुख-६४ जोदेखिलियादेखणेंसरे जोचाखिल्याचाखणेंपुरे जोऐकिलियाऐकणेंवोसरे जोचिंतितांमुरेचित्तवृत्ती ६५ जासिजा-लियाभेटी भेटीसीनपडेतुटी जासींबोलतांगोष्टी पडेमिठीपरमार्थी ६६ ज्यासिदिधलियाखेव खेवाचीपुरेहाव ज्यान-चेंघेतांचिनाव नासेसर्वमहाभय ६७ तोसत्यसंकल्पईश्वर स्वलीलासर्वेश्वर स्वपदाशारंगधर अतिसत्वरनिघोंपाहे २६८ श्लोक ब्रह्मण्यानांवदान्यानांनित्यंवृद्धोपसेविनां विप्रशापःकथमभूद्वृष्णीनांकृष्णाचेतसाम् ८ टीका आदरेंपु-सेपरीक्षिती यादवविनवीतविप्रभक्ती त्याशींशापपडेकैसाराती सांगमजमनीशशुकयोगींद्रा ६९ यादवदानेंअतिउदार राजेहोऊनिपरमपवित्र ब्राह्मणसेवेसीतत्पर आज्ञाकरकृष्णाचे २७० यादवसदांकृष्णायोगेसीं नित्यसाधूयादवांपा-सीं तेथेंचिवसेनारदऋषी शापूयादवांघडेकैंचा २७१ श्लोक यन्निमित्तःसवैशापोयादृशोद्विजसत्तम कथमेकात्म-नांभेदएतत्सर्ववदस्वमे ९ टीका शापासिमूळसुख्यसंताप कैसेंनिआलाब्राह्मणाकोप कोणेपरीचादिधलाशाप संक्षेप-रूपेंसांगेंमज ७२ यादवसमस्तसखेबंधू त्यांसिप्रतिपाळीश्रीगोविंदु एकात्मतास्वगोत्रसंबंधु त्यामाजीयुद्धभेदुघडेकैसा ७३ आत्मावैपुत्रनामासि हेंश्रुतिप्रमाणसर्वासि तेथेंशापबाधीकृष्णात्मजासी केवींआलीयासिसत्यत्वें २७४ कृष्णासं-



" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

कल्पकुलनाशन तोंचिब्राह्मणशापासिकारण यालागींबाधकजाण होयसंपूर्णयादवां २७५ सृष्टीसृजीपाळीसंहारी हें
कृष्णासंकल्पमात्रेंकरी तोयदुकुळनिधननिर्धारी त्याची अवतारथोरींश्रीशुकसांगे ७६ श्लोक श्रीशुकउवाच बिभ्रद्व-
पुः सकलसुंदरसन्निवेशंकर्माचरन्भुविसुमंगलमाप्तकामः आस्थाय धामरममाणउदारकीर्तिः संहर्तुमैच्छत-
कुलंस्थितकृत्यशेषः १० कर्माणिपुण्यनिवहानिसुमंगलानिगायज्जगत्कलिमलापहराणिकृत्वा कालात्मनानिव-
सतायदुदेवगेहे पिंडारकंसमगमंमुनयोविसृष्टाः ११ टीका रायातेंह्मणेश्रीशुक कर्ताकरविताश्रीकृष्णनायक तो
शापार्थअत्यंनिक आत्मजा अविवेकउपजवीस्वयें ७७ स्वयेंजावयानिजधामा थोर आवडीपुरुषोत्तमा यालागीं अव
शेषकर्मा मेघःश्यामा लवलाहो ७८ केव्हांहोईलकुळक्षयो हेंमनीधरीदेवो तोदेवाचानिभावो शापासीपाहोंददमूळ ७९
जोकुळक्षयातेंचिंती त्याकृष्णाचीसुंदरमूर्ती शुकसांगेपरिक्षितीप्रती स्वानंदस्थितीउल्हासें २८० सकळसौंदर्या अधि
वासु धरूनिमनोहरवेषू लावण्यकेलाविन्यासु आणिजगदीरूनिजांगें ८१ नवलसौंदर्याचीकउठी सर्वांगींगुंनल्या
जनदृष्टी कृष्णास्वरूपींपडेमिठी होतसंतुष्टीडोळयां ८२ जैसीगुळींमासीवरीमासी तेविंदृष्टीकृष्णास्वरूपासीं सर्वांगीं
वेटिनीचौपासी अहर्निशींनोसंडिती ८३ नयनलीलावलला मा दृष्टीसींनिघालियाजिभा यापरीकृष्णशोभा स्वानं-
दगाभासाकार ८४ तोश्रीकृष्णादेखिल्यादृष्टी नेपरतोनिमागुतीनुठी अधिकाधिकघालिनीमिठी देखेसकळसृष्टीकृष्ण
रूप ८५ कृष्णाअनिसुंदरमनोरम ह्मणाल असेलत्याविषयधर्म तरीनोअवाप्तसकळकाम आत्मारामश्रीकृष्ण ८६ कृ-
ष्णाआवाससकळकाम त्यासिंकांद्वारकागृहाश्रम स्त्रीपुत्रराज्यसंभ्रम विषयकामकांभोगी ८७ चहूं आश्रमाप्रकाश
क त्रैलोकींगृहस्थकृष्णाएक तोनिब्रह्मचारीनैष्ठिक अतिनेटकसंन्यासी २८८ कृष्णदेहींनाहींदेवबळ लीलाविग्रहींनिस्क

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

16

ए·ना· ळोळ त्याचींसर्वकर्मेंपावनशीळ उद्धरीसकळश्रवणकथनें २८९ कृष्णाकर्मांचें जोकरीस्मरण तेंकर्मतोडीकर्मबंधन ऐसेंउ भा·अ
९ दारकर्मांनें आचरण आचरलाकृष्णादीनोद्धारा ९० श्रीकृष्णअसेलसकाम ह्मणालयालागीं आचरेकर्म ज्याचेंनामनिर्दळीस १
र्वकाम तोस्वयेंसकामघडेकेवीं ९१ श्रीकृष्णाचास्मरतांकाम स्वयेंसंन्यासीहोतीनिष्काम सकामाचानिर्दळेकाम ऐसेंउदार
कर्मआचरला ९२ तेणें अवाप्तसकळकामें ऐसींआचरलाअगाधकर्में मानवीतरावयामनोधर्में कीर्तिमेघःशामेंविस्तारि-
ली ९३ कैसेंकर्मसुमंगळ कानींपडतांचि आकुमाळ नासोनीकर्ममूळ जातीतात्काळश्रवणादरें ९४ श्रवणेंउपजेसद्भा-
वो सद्भावेंप्रगटेदेवो तेणेंनिर्दळेअहंभावो ऐसीउदारपाहोहरिकीर्ति २९५ श्रीकृष्णकीर्तीचेंस्मरण कांकरितांश्रवणप
ठण उद्धरेलबहुसालजाण पुढेंभविष्यमाणउद्धरती ९६ जरीकेलियाहोतीपुण्यराशी तरीअवधानहोयकथेसी येरांऐ
कतांपापराशी लागोअनायासेंअतिनिद्रा ९७ जेहरिकथेसीसादर त्याच्यापुण्यासींनाहींपार कृष्णेंसुगमोपावोकेला-
थोर दीनोद्धारहरिकीर्तनें ९८ कृष्णकीर्तनेंगर्जतांगोष्टी लाजिल्याप्रायश्चित्ताच्याकोटी उतरल्यातीर्थांच्यापाउठी ना-
मासाठीं निजमोक्ष ९९ ऐसानिजकीर्तीउदार पूर्णब्रह्मशार्ङ्गधर लीलाविग्रहीसर्वेश्वर पूर्णावतारयदुवंशीं ३००उत
रलाधराभार येथें सत्यनामानींश्रीकृष्णनाथ यादवउरले अद्भुत हेहीसमस्तनिर्दाळावे १ येअवतारीं हृषीकेशी ह्म
णेहेंचिकृत्यउरलेंआह्मासी निर्दळूनियांनिजवंशासी निजधामासींनिघावें २ तोयादवांमाजीं माधव काळात्मादेवादि-
देव जाणोनिभविष्यभाव कायअपूर्वकरिताजाला ३ नारदादीमुनीजन त्यांसींपाचारूनिआपण करूंसांगेशीघ्रगम-
न स्वयेंश्रीकृष्णसाक्षेपें ४ ज्यापासूनिसंतदुरीगेले तेथेंअनर्थाचेंकेलेंचालें हेंयादवनिधानालागींवहिलें लाघवकेलें ९
श्रीकृष्णें ३०५ भक्तसंतसाधूज्यापासीं तेथेंरिघनाहीं अनर्थासी हेंस्वयेंजाणेहृषीकेशी येराकोणासीकळेना ६ जेथें

संतांचासमुदावो तेथेंजन्ममरणाचाअभावो हाश्रीकृष्णाचिजाणेभावो तोकरीलउपावोब्रह्मशापार्थ ३०७ जेथूनिसंतगे
लेदुरी तेथेंसर्वअनर्थवाजेशिरीं हेंजाणोनिश्रीहरी द्वारकेबाहेरींऋषीघाली ८ ऋषीजानहोतेस्वाश्रमासी त्यांतेंलाघ
वीऋषीकेशी तीर्थमिषेंसमस्तांसीं पिंडारकासोपाठविलें ९ पिंडारकामुनिगण श्रीकृष्णेंधाडिलेकोणकोण ज्यांचेंक
रितांस्मरण कळिकाळआपणस्वयेंकापे ३१० श्लोक विश्वामित्रोऽसितःकण्वोदुर्वासाभृगुरंगिराः कश्यपोवाम-
देवोत्रिर्वसिष्ठोनारदादयः १२ टीका जेतपोतेजेंदेदीप्यमान जेपूर्णज्ञानेज्ञानघन ज्यांतेंसदांवंदीश्रीकृष्ण तेऋषी
श्वरजाणनिघाले ११ जोगायत्रीमंत्रासाठीं करूंशकेप्रतिसृष्टी जोविश्वामित्रमहाहटी तोहीउठाउठीनिघाला १२ जे
थेंनबाधीतऊष्णशीत तेआश्रमींअसित ज्याचेनिनावेंद्वंद्वपळत तोहीत्वरितनिघाला १३ जोसूर्यासिरिघोनिशर
ण अश्वाचेकर्णींबैसोनिआपण पूर्णकेलेंवेदपठण तोकण्वहीजाणनिघाला १४ दुर्वासाजोअत्याहारी आहारसे-
उनीनिराहारी पूर्णतपियाब्रह्मचारी तोहीद्वारकेबाहेरीत्वरेंकरीनिघाला ३१५ भृगुचाश्रीचरण हृदयींवाहेनारा
यण मिरवीश्रीवत्सभूषण तोहीभृगुजाणनिघाला १६ अंगिरास्वयेंकरीसृष्टी बृहस्पतीजन्मलाज्याचेपोटीं तोपर
मगुरुदेवाच्यामुगुटीं तोहीउठाउठीगमनार्थ १७ कश्यपाचीनवलगोष्टी सुरनरपन्नगजन्मलेपोटीं यालागींहेंकश्य
पीसृष्टी तोहीउठाउठीनिजगमनें १८ मुक्तांमाजीश्रेष्ठभावी वेदींवाखाणावेवामदेवो तोहीद्वारकेहूनिपाहो स्वयेंस्वय
मेवोनिघाला १९ अत्रीचीनवलपरी तिन्हीदेवजन्मलेउदरीं श्रीदत्तवंदीजेयोगेश्वरीं हेअगाधथोरीअनुसूयेची-
३२० तोस्वयेंअत्रिऋषेश्वर श्रीकृष्णाआज्ञानत्पर पिंडारकाअतिसत्वर प्रयाणशीघ्रतेणेंकेलें २१ जोश्रीरामाचास-
द्गुरु ब्रह्मज्ञानेंअतिउदारु त्याचेकाठीचाप्रतापथोरु लाजविलादिनकरूतपतेजें ३२२ ऐसाजोवसिष्ठमुनि तोहीकृष्णा

आज्ञामानुनी निघाल्याद्वारकेहूनी शीघ्रपणींपिंडारका ३२३ आणिदेवर्षीनारदु त्याचाहीअगाधबोधु त्यासींसर्वदांपरमा
नंदु अतिउल्हादुहरिकीर्तनीं २४ ब्रह्मविणास्वयेंवातु ब्रह्मपदेंगीनगातु ब्रह्मानंदेंनाचतु निघेडुल्लतुपिंडारका ३२५इ-
त्यादिमुनीश्वर श्रेष्ठश्रेष्ठऋषीश्वर शिष्यसमुदायपरिवार मिळालेअपारपिंडारकीं २६एवंपीडारकींऋषीसर्व शा
पानुभावअपूर्व मिनलेतेकृष्णावैभव अतिगोरवेंवर्णिती २७बापूल्याघवीवनमाळी कुळक्षयोघडावया तात्काळी कु
मारींऋषेश्वरासिंरांडोळी कपटमेळेंमांडिली २८निद्राअवज्ञाहेळन करितांब्राह्मणासीछळण जेथेंब्रह्मद्वेषउठीपू-
र्ण कुलक्षयजाणत्वरितनेथें २९ब्राह्मणाच्याकोपापुढें कुळकार्सेबापुडें महादेवाचेंलिंगझडे इंद्रपदवीपडेसमुद्रीं
३३० तोसमुद्रहीकेलाक्षार ऐसाद्विजकोप अतिदुर्धर हेंपरम...काचेंचरित्र तेऋषीसमग्रमिनलेतेथें ३१ धरातळीं-
ब्राह्मण त्याचेंवचनपरमपावन हेंसत्यकरावयाश्रीकृष्ण कुळनिर्दळनस्वयेंदावी ३२ श्लोक ब्रीडंतस्तानुपव्रज्य-
कुमारायदुनंदनः उपसंगृह्यपप्रच्छुरविनीताविनीतवत् १३ टीका यदुनंदनसमस्त क्रीडाकंदुकझेलित ए
कमेकानेंहाणित टकलूनिलपतपरस्परें ३३ ऐसे...क्रीडाविहार करितआलेयदुकुमर आंगीश्रीमदीं अपारउ
द्धतथोरउन्मत्त ३४ अतीत अनागतज्ञानवंत ऋषीमिनलेसमस्त याचेंवचनइत्थंभूत यांसींनिश्चितठकवूंआह्मीं-
३५ अवघडयेऊनिपडे तैंयाचेंवचनऐसेंघडे ह्मणोनीऋषीश्वरांचेपुढे मांडिलेंकुडेंयदुकुमरीं ३६ श्लोक तेवेषयि
त्वास्त्रीवेषैः सांबंजांबवतीसुतम् कृत्वादरंतुसंमहद्दस्त्राद्यैर्यदुनंदनाः एषापृच्छतिवोविप्रा अंतर्वत्न्यसितें
क्षणा १४ टीका पहिलेंचिश्रीमदें अद्भुत त्यावरीमांडिलेंकपट सांबाचीस्त्रीनट अतिवरिष्ठबाणला ३७ तोशामसुं १०
दरडोळस आंगींशोभलीस्त्रीवेष प्रमदादिवैभवविलास दावीविन्यासस लज्ज ३३८ नयनींसोगयाचेंकाजळ वि

(19)

(19)

कर कटाक्ष अतिचपळ सुंदरसुकुमारवेल्हाळ चालेनिश्चळहंसगमनी ३९ वस्त्रें बांधोनियां उदर नावेककेलें थोर ने
णोंने गरोदर दिसे साचार इतरांसी ३४० हात घालोनी सखीयांचा खांदी चालतां उदर राहो लोनेदी विसावा घेत पदोपदीं
येतां ऋषीवृंदीं देखिली ४१ ऐसा स्त्रीवेष दाउनी नावेक अंतरीं राहुनी इतर ऋषींजवळ येवूनी लोटांगणी घातल्या ४२
पूर्वश्लोकींचे श्लोकार्ध तेथें व्याख्यानीं नवेंचि संमते यालागीं येचि येथें वाखाणी जे तेकथान्वयें ४३ छळाचे निमिषें
जाण ऋषीसी करोनि प्रदक्षिणा अत्यादरें लागले चरणा स्वामीन्त्या दर्शना आह्मीं आलों ४४ ऐसें यदुकुमर समस्त अ
विनीत परी विनीतवंत करजोडूनि राहिले तेथें मृदुविनयीत मुनेश्वर ४५ स्वामीजी पेल हें सुंदर तुमचे वचनीं भावार्थी
थोर आसन्नप्रसवा गरोदर स्वयें सकुमार पुसे लाज ४६ श्लोक प्रष्टुं विलज्जती साक्षात्प्रब्रूतामेघदर्शनाः प्रसो-
ष्यंती पुत्रकामा किंस्वित्संजनयिष्यति १५ टीका स्वयें पुसों नेतुह्मांप्रती तिचे निजबोलवें निश्चिती यालागीं आह्मा
हातीं सेवेसि विनंती करविली ४७ तुह्मीं सत्यदर्शी साचार अमोघवीर्य तेंतुमचें उत्तर शिरीं वंदिती हरीहर ज्ञान उदार तु
ह्मीं सर्व ४८ यालागीं हे गर्भवती सादरें असे पुसती पुत्र काय असे वांच्छिती काय निश्चिती प्रसवेल ४९ ऐसें कपटा
चे निवालंभे विनवीत करजोडुनी उभे तेसीं फळें भावगर्भे छळप्रलोभें पावती ३५० कर्म जाणोनियां कुडें नारद नाचे त्र
षीपुढें मनीं ह्मणे यादवांचें गाढें निधन रोकडें वोडवलें ५१ मुंगीये निघालिया पांख तिसी मरण ये अचुक तेवीं ब्राह्मण
छळणें देख अवश्य कुळनाश ५२ शापीत अल्प हि द्विजजन त्यासीं सद्भावें करीं नमन मारो आलिया ब्राह्मण मस्तक आ
पण वोडवावा ५३ त्या ब्राह्मणासी जें छळण तें जाणावें विषभक्षण विषें निमे भक्षी त्याचा प्राण कुळनिर्दळण द्विज छळ
णें ५४ अविद्य कि विद्य ह्मणतां जाण धरातळीं ब्रह्म ब्राह्मण त्याचें करूं जातां छळण कुळनिर्दळण अवश्य ३५५ श्लो०

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**

राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)

**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८

**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com